प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

वर्तमानपत्रास लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानले जाते. जगातील अनेक सामाजिक, धार्मिक अथवा राजकिय चळवळी यशस्वी करण्यात वर्तमानपत्राचा वाटा महत्वाचा आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात, लोकजागृतीचे फार मोठे कार्य वर्तमानपत्रांनी केलेले आहे. 'सत्यवादी' हे दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रमुख वर्तमानपत्र होते. 'सत्यवादी'चे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळया प्रसंगी निघणारे त्यांचे विशेषांक, खास अंक, स्त्रियांसाठी स्त्री विभाग, सिनेमा जगत, क्रीडा विभाग इत्यादी होय. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक, राजकिय, कोल्हापूर संस्थान इत्यादी विषयांवर सत्यवादीमधून बरेच लेख प्रकाशित झालेले दिसतात.

दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीमध्ये 'सत्यवादी' वर्तमानपत्राचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. याचे श्रेय अर्थातच सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांनाच आहे.

सत्यवादीकार पद्मश्री बाळासाहेब पाटील (१९०२-१९८७) हे एक पुरोगामी व क्रांतीकारक पत्रकार होवून गेले. पत्रकारितेबरोबरच कथा, कादंबरी, कविता, नाटक, पटकथा, पोवाडे इत्यादी ललित वाङ्.मयाचे प्रकारही त्यांनी हाताळले. त्यांनी १९२६ ला 'सत्यवादी' वर्तमानपत्र काढले व १९२७ पासून आपल्या निधनापर्यंत म्हणजेच १९८७ पर्यंत ते संपादक, मुद्रक, मालक होते. जवळजवळ ६० वर्षे ते संपादक म्हणून सत्यवादीत अग्रलेख लिहित होते आणि इतकी वर्षे संपादक होण्याचा मान जगामध्ये फार कमी लोकांना मिळाला असेल.

दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीमध्ये 'सत्यवादी' या वर्तमानपत्राचे योगदान महत्वाचे असल्याने मी या लघुशोध प्रबंधात सत्यवादीची भूमिका मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न

करीत आहे. सुदैवाने सत्यवादीच्या मागील फाईल्स व वेळोवेळी निघणारे खास अंक सत्यवादी कचेरीमध्ये उपलब्ध आहेत. त्यांचा मी सविस्तर अभ्यास करुन या माझ्या लघुशोध प्रबंधाची मांडणी केलेली आहे. त्याचबरोबर सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू कसे होते यासंबंधी इतर साधनांतून मिळणा-या माहितीचाही उपयोग केलेला आहे.

दैनिक 'सत्यवादी' व बाळासाहेब पाटील यांचे कार्य सांगण्यापूर्वी भारतात, महाराष्ट्रात व कोल्हापूर संस्थानात सत्यवादी पूर्वी निघणा-या वृत्तपत्रांचा थोडक्यात आढावा घेत आहे. तो या ठिकाणी अप्रस्तुत होणार नाही.

आधुनिक लोकशाहीच्या काळात राष्ट्रीय जीवनात व समाजाच्या सार्वजनिक जीवनात वृत्तपत्रांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. कारण वृत्तपत्रे ही मोठी सामाजिक शक्ती आहे. म्हणूनच विधीमंडळ, कार्यकारिणी व न्यायसंस्था यांच्या जोडीला राष्ट्र जीवन प्रभावित करणारी चौथी शक्ती (Forth Estate) असा वृत्तपत्रांचा उल्लेख करण्यात येतो. समाजाच्या सर्वांगिण जीवनावर संस्कार करण्याचे कार्य वृत्तपत्र करतात. 'बातमीपत्र' हा शब्द इंग्रजीतील 'News ' या शब्दावरुन आला असे मानतात. पण (मुळात New हा शब्दच संस्कृतमधील ' नव' हा शब्द एकच होता. 'नव' ला 'ल' हा प्रत्यय लागून 'नवल' हा शब्द तयार होतो व 'नवल' म्हणजे नवी अथवा ज्ञात नसलेली गोष्ट होय. अशाप्रकारे 'वृत्तपत्र' किंवा 'बातमीपत्र' हा शब्द तयार झाला असावा.[1]) दररोज व्यवहारात घडणा-या घटना प्रसिध्द करणा-या पत्राला 'वर्तमानपत्र' म्हणतात. बातम्या जाणून घेण्याची उत्सुकता अमीर उमरावापासून ते सर्वसामान्य माणसापर्यंत सर्वांनाच असते. या उत्सुकतेपोटीच वर्तमानपत्राचा उदय झाला. युरोपात पंधराव्या शतकात मुद्रणकलेचा उदय झाला. त्यावेळी असलेले एक चौकोनी दुमडलेले हॅण्डबील म्हणजेच आजच्या वर्तमानपत्राचा पूर्वज होय.[2] आजच्या सारखे त्यावेळी लोकांचे लक्ष वेधण्यासाठी महत्वाच्या बातम्या ओरडून जाहीर करीत.

## वृत्तपत्रांचे कार्य -

समाजाला जागृत करण्याचे, त्यांच्या मनावर संस्कार करण्याचे आणि एखाद्या चांगल्या कार्यास लोकांना प्रेरणा देण्याचे कार्य वृत्तपत्र करीत असतात. एखादा नवा विचार, नवा कायदा समाजात रुजविण्यापूर्वी लोकमत तयार करावे लागते. लोकांच्या मनात या नव्या विचारांची बीजे पेरावी लागतात. ही बिजे पेरण्याचे कार्य वृत्तपत्रे खंबीरपणाने करतात. मुद्रण व्यवस्थेमुळे एकाच वेळी लिखीत मजकूराच्या असंख्य प्रती काढता येतात. त्यामुळे एकाच वेळी एकच विचार अनेकांच्या मनात रुजविणे वृत्तपत्रांमुळे शक्य होते. म्हणूनच लष्करी शक्तीपेक्षा वृत्तपत्राची शक्ती मोठी ठरली. लोकमताला, अन्यायाला वाचा फोडणे, त्याला योग्य वळण लावणे हे काम वृत्तपत्रे करतात. वृत्तपत्राला त्याच्या कार्यामुळेच कोणत्याही देशाच्या राष्ट्रीय जीवनात महत्व प्राप्त झाले आहे. वृत्तपत्राचे हे प्रभावी शस्त्र कसे वापरावयाचे याचा धडा भारतात ब्रिटीश सरकारी अधिका-यांनी व युरोपियन मिशन-यांनी भारतीय लोकांना दिला.[३] त्यामुळे अनेक भारतीय विद्वानांनी आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी ग्रंथ लेखनाऐवजी वृत्तपत्राच्या माध्यमाचा वापर केला. कारण कुठलीही सामाजिक समस्या असो अथवा कोणतीही सामाजिक सुधारणा करण्याची असो यासाठी वृत्तपत्रांनी जे कार्य केले ते अनन्यसाधारण आहे.

## भारतात वृत्तपत्रांची सुरुवात -

भारतात प्रथम वृत्तपत्रे सुरु करण्यात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकराचा पुढाकार होता. सर्वप्रथम हा प्रयत्न विल्यम बोल्टस नावाच्या एका डच ग्रहस्थाने केला होता. परंतु त्याच्या या प्रयत्नांना अपयश आल्यामुळे भारतात वृत्तपत्र जन्मास घालण्याचे भाग्य जेम्स ऑगष्टस हिकी याला लाभले. २९ जानेवारी, १७८० रोजी 'बंगाल गॅझेट' या नावाने हिकीने इंग्रजी साप्ताहिक सुरु केले.[४] हेच भारतातील पहिले वर्तमानपत्र होय. सुरुवातीला या वृत्तपत्राचे ध्येय इंग्रजांना माहिती देणे हेच प्रमुख होते. परंतु भारतातील या पहिल्या वृत्तपत्राचा

इतिहास अभिमान बाळगावा असा मुळीच नाही. या पत्रातील लेखन हीन दर्जाचे, अभिरुचीची चाड नसणारे असावे ही गोष्ट योगय नाही. व्यक्तीच्या वर्तनावर केलेली टिका योग्य असली तरी शारीरिक व्यंगाचा किंवा इतर दोषांचा वारंवार उल्लेख करुन टिका करणे योग्य नाही.[५] परंतु व्हिकीच्या या पहिल्या वृत्तपत्राचे स्थान विसरता येणार नाही. या पहिल वृत्तपत्राचे काही अंक ब्रिटीश म्युझियमच्या वृत्तपत्र संग्रहात व काही अंक कलकत्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयात आहेत.

'बेंगाल गॅझेट' या वृत्तपत्रानंतर १७८४ मध्ये 'कलकत्ता गॅझेट', १७८५ मध्ये 'मद्रास कुरियर' इत्यादी वर्तमानपत्रे सुरु झाली. यानंतर मुंबईमध्ये पहिले वृत्तपत्र, १७८९ मध्ये 'बॉम्बे हेराल्ड' या नावाने सुरु झाले. या वृत्तपत्रांची भाषा इंग्रजी असे. भारतीय भाषातील वृत्तपत्रे ही १८१८ नंतर सुरु झाली. १८१८ मध्ये 'दिग्दर्शन' हे बंगाली मासिक, पुढे 'समाचार दर्पण' हे बंगाली साप्ताहिक निघाले. यानंतर गुजराती भाषेतील वृत्तपत्रे निघाली.[६] या सर्वच वृत्तपत्रांचा उद्देश प्रामुख्याने भारतातील ब्रिटीशांना बातम्या पुरविणे हाच असल्याचे दिसून येते.

**मराठी वृत्तपत्रे -**

महाराष्ट्राने पत्रकारितेची एक उज्वल परंपरा निर्माण केलेली आहे. या परंपरेत बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन यांच्यापासून टिळक, आगरकर, शिवरामपंत परांजपे, न.चि. केळकर, खाडीलकर, कोल्हटकर, आचार्य अत्रे, नानासाहेब परुळेकर यांच्यासारखे अनेक दिग्गज या भूमित अवतीर्ण झाले. या पत्रकारांनी आपल्या लेखणीने महाराष्ट्राचे मन घडविले. समाज सुधारणेबरोबर समाज निर्मिती करण्याचे व्रत या वृत्तपत्रांनी स्वीकारले. सत्याचा पाठपुरावा करण्यासाठी या पत्रकारांनी आपले आयुष्य वेचले. त्यामुळे सामाजिक आणि राजकीय या दोन्ही क्षेत्रांत झुज देणारी निधडया छातीचल परंपरा मराठी वृत्तपत्रसृष्टीत आपणास पहावयास मिळते. मराठी वृत्तपत्र

जन्माला आले ते मुख्यतः प्रबोधनाच्या हेतूने पुढे, त्यामध्ये टीका, प्रक्षोभ, निंदा व स्तुती या गोष्टींचा समावेश होत गेला. राजकारण व राजकीय पुढारी यांना सध्याच्या वर्तमानपत्रांमध्ये अधिक प्राधान्य दिले जाते. लोकमान्य टिळकांच्या किंवा त्यांच्या नंतरच्या काळात आग्रही मतपत्र म्हणून जे त्याला स्वरुप होते ते मागे पडले आहे. एकसारख्या बातम्या किंवा एकाच विषयावर अग्रलेख न लिहिता व्यापार, उद्योग, देशी विदेशी खेळ, संगीत नृत्य व चित्रपट इत्यादी कला उपक्रमाची परिक्षणे त्यासाठी आठवडयातून रंजन पुरवण्या असे त्याचे स्वरुप बदलत आहे. पण यामध्ये एक गोष्ट निश्चित आहे की भारतीय भाषातील वृत्तपत्रात मराठी वृत्तपत्र आघाडीवर राहिले आहे.[७] याचे कारण म्हणजे मराठी वृत्तपत्र बदलत्या परिस्थितीनुसार ते बदलत गेले.

मराठी वृत्तपत्राचा असो किंवा एखाद्या वृत्तपत्राचा असो यांचा इतिहास पाहताना स्वातंत्र्यपूर्व काळातील काही मराठी वृत्तपत्रांचे कार्य पाहणे गरजेचे आहे. कारण वृत्तपत्र हे मुळातच प्रभावी साधन आहे. म्हणूनच टिळक, आगरकर यासारख्या ध्येयवादी नेत्यांनी वृत्तपत्रांचा वापर केला. सामाजिक सुधारणा असो किंवा वंगभंग चळवळ असो अथवा त्यानिमित्ताने झालेले कोणतेही राष्ट्रीय आंदोलन असो, यामध्ये मराठी वृत्तपत्र नेहमीच सहभागी झाली आहेत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वसामान्य जनतेमध्ये मोठया प्रमाणात राष्ट्रीयत्वाचा उदय झाला. त्यामुळे राष्ट्रात चाललेल्या घटना जाणून घेण्याविषयी लोकांच्या मनात जिज्ञासा निर्माण झाली आणि ही जिज्ञासा तृप्त करण्याची जबाबदारी अर्थातच मराठीतील 'दर्पण, प्रभाकर, इंद्रप्रकाश, काळ, देशसेवक, ज्ञानप्रकाश, विजयी मराठा' इत्यादी वृत्तपत्रांनी उचलली.

**दर्पण -**

पहिल्या मराठी वृत्तपत्राचा जनक म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांचे स्थान अग्रगण्य आहे. बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी, १८३२ पासून 'दर्पण' हे

वृत्तपत्र सुरु केले. सुरुवातीला हे पाक्षिक होते.[८] या वृत्तपत्रात मराठी इंग्रजी मजकूर समोरासमोर देण्यात येत असे. दर्पण सुरु करण्याचा मुख्य हेतू म्हणजे नव्या ज्ञानाचा प्रसार करणे, पाश्चात्य विद्यांचा लोकांना परिचय करुन देणे हाच होता. आर्थिक व सामाजिक विषयाबरोबर सरकारचे धोरण कसे असावे? हिंदू विधवांचा पुर्नविवाह, धंदे- शिक्षणाची गरज या विषयावरही बाळशास्त्री जांभेकर यांनी अनेक लेख लिहिले आहेत. दर्पणाच्या अगोदरची व नंतरची सुमारे २५ ते ३० वर्षाच्या काळातील वृत्तपत्रांचे कार्य पाहिले असता दर्पणाला उच्च स्थान द्यावेच लागेल असे कार्य 'दर्पण'ने केले आहे. दर्पणातील उच्च दर्जाचा विचार करुन तत्कालिन गव्हर्नर जेम्स, कार्नाक यांनी 'जस्टीस ऑफ द पीस' असा किताब देऊन बाळशास्त्री जांभेकर यांचा गौरव केला आहे.[९] दर्पणाच्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकर यांनी मिशन-यावरच टीका केली असे नाही तर जाती भेद निर्मुलन, स्त्री शिक्षण, विधवा विवाह यांचाही पुरस्कार केला. २४ रु. वार्षिक वर्गणी असणारे व अल्पावधीत ३०० वर्गणीदार लाभलेले वर्तमानपत्र सुमारे साडे आठ वर्ष चालल्यानंतर २६ जून, १८४० रोजी शेवटचा अंक प्रकाशित होवून बंद पडले. दर्पणाच्या अलौकिक कार्याबद्दल लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी लोकांची 'बृहत्तर जिव्हा' असा दर्पणचा गौरव केला, तो अत्यंत योग्यच आहे.[१०]

## मुंबई अखबार -

'दर्पण' या वृत्तपत्रामध्ये मराठीबरोबर इंग्रजी मजकूर प्रसिध्द होत असल्याने त्याला द्विभाषिक पत्र म्हणावे लागते. संपूर्ण मराठी वर्तमानपत्र म्हणून ज्याचा उल्लेख करावा लागतो. ते म्हणजे 'मुंबई अखबार' हे होय. या वृत्तपत्राची सुरुवात ४ जुलै, १८४० रोजी झाली. 'दर्पण' पत्र ज्या 'युनायटेड सर्व्हीस गॅझेट' मध्ये समाविष्ट करण्यात आले, त्या वृत्तपत्राच्या चालकांनी 'मुंबई अखबार' हे मराठी वृत्तपत्र सुरु

केले. 'दर्पण'ची उणीव भरुन काढावयाची म्हणजे मराठी वाचकासाठी एखादे पत्र काढणे हा एकमेच उद्देश होता. परंतु हे पत्र फार काळ चालले नाही.

**प्रभाकर -**

२४ ऑक्टोबर, १९४१ रोजी भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' हे वृत्तपत्र सुरु केले. दोन कॉलमची आठ पाने असलेल्या 'प्रभाकर'ची वार्षिक वर्गणी रु. १२/- होती. स्वतंत्र बाणा व सतत आपली विवेकी वृत्ती जागृत ठेवणारे भाऊ महाजन हे पत्रकारितेस पूर्ण वेळ वाहून घेणारे पहिले पत्रकार होय. अंधश्रध्देने पछाडलेल्या समाजाला पाश्चात्य शिक्षणाचे, नव विचारांचे औषध देऊन ज्ञानसंपन्न, समर्थ बनविणे या ध्येयाने भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' हे वृत्तपत्र सुरु केले. केवळ कोणाचीही निंदा नालस्ती करावयाची किंवा एखाद्याची स्तुती करावयाची अशी वृत्ती भाऊ महाजन यांनी कधीही जोपासली नाही. जे चांगले त्याचाच त्यांनी पुरस्कार केला. केवळ पत्रकारिता हाच व्यवसाय स्वीकारलेल्या भाऊ महाजन यांची लेखणी केवळ 'प्रभाकर' या एका साप्ताहिकावर थांबणार नव्हती. त्यांनी प्रभाकर सुरु ठेवूनच १८५३ साली 'धुमकेतू' नावाचे एक साप्ताहिक व पुढे १८५४ साली 'ज्ञानदर्शन' नावाचे त्रैमासिक सुरु केले. 'प्रभाकर' वृत्तपत्र २०-२२ वर्षे चालू होते. १८६२ मध्ये भाऊ महाजन नागपूर येथे स्थायिक झाल्यावर हे वृत्तपत्र बंद पडले.[१२] प्रभाकरने निर्माण केलेला हा परखडपणा व स्वतंत्र बाणा हा पुढे टिळक, आगरकर यांनी निर्माण केलेल्या धडाडीचा सूचक होता.

**ज्ञानप्रकाश -**

दीर्घकाळ चाललेले एक मराठी वृत्तपत्र म्हणून 'ज्ञानप्रकाश' चा उल्लेख करणे गरजेचे आहे. कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी १२ फेब्रुवारी, १८४९ रोजी 'ज्ञानप्रकाश'

चा पहिला अंक प्रकाशित केला. सुरुवातीला साप्ताहिक असणारे 'ज्ञानप्रकाश' १८५३ पासून द्विसाप्ताहिक व १४ ऑगस्ट, १९०४ पासून दैनिक झाले. १९०९ पासून 'ज्ञानप्रकाश'ची मालकी ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाने घेतली. तेंव्हापासून १९५० ला हे वृत्तपत्र बंद होईपर्यंत या समाजाच्या मालकीचे होते.

भारत समाज सेवकांकडे ज्ञानप्रकाश आल्यावर या पत्रातून उदारमतवादी धोरणाचा पुरस्कार केला. त्यामुळे नेमस्ताचे मुखपत्र अशी वृत्तपत्राची गणना होत असे, तरी ज्ञानप्रकाशने अनेक सामाजिक विषय हाताळले आहेत. 'ज्ञानप्रकाश' ला प्रतिष्ठा व लोकप्रियता मिळवून देण्याचे कार्य ख-या अर्थाने काकासाहेब लिमये यांनी आपल्या संपादकीय कारकिर्दीत केले. ३१ डिसेंबर, १९५० या दिवशी या वृत्तपत्राच्या शेवटचा अंक प्रकाशित झाला. १०३ वर्षे चाललेले हे वृत्तपत्र चालकांनी बंद केल्यावर हे वृत्तपत्र बंद करु नये म्हणून महाराष्ट्रात त्यावेळी एक सार्वत्रिक विरोधाची भावना प्रकट झाली. शताब्दीची वाटचाल करणारे 'ज्ञानप्रकाश' हे मराठीतील पहिले वृतपत्र राजकारणात फारसे यशस्वी झाले नाही. तरी सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया महाराष्ट्राला नवा आकार देण्याचे श्रेय या वृत्तपत्राला द्यावे लागेल."[४]

**इंदूप्रकाश -**

पदवीधर झालेल्या सुशिक्षीत भारतीय तरुणांना सुधारणा विचारांचा प्रसार करण्यासाठी एखाद्या वृत्तपत्राची गरज भासू लागली. यातूनच 'इंदूप्रकाश' या वृत्तपत्राचा उदय झाला. २ जानेवारी, १८६२ रोजी 'इंदूप्रकाश' हे साप्ताहिक सुरु झाले. विष्णुशास्त्री पंडीत, महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी हे वृत्तपत्र सुरु केले. सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या विचारसरणीचे 'इंदूप्रकाश' हे मुखपत्र होते तर १८६७ मध्ये स्थापन झालेला 'प्रार्थना समाज' हे त्यांचे व्यासपीठ होते.

१९०२ पासून 'इंदूप्रकाश' दैनिक स्वरुपात निघू लागले. हे पत्र विशेष गाजले ते याने केलेल्या विधवा विवाहाच्या पुरस्कारामुळे होय. याबाबतचे सर्व श्रेय जाते ते विष्णुशास्त्री पंडीत यांच्याकडे होय. 'इंदूप्रकाश' हे वृत्तपत्र ६२ वर्षे चालू होते. या पत्राला अनेक विद्वानांचा सहवास लाभला, त्यामुळेच न्या. रानडे, तेलग, चंदावरकर इत्यादी या विद्वानांनी वृत्तपत्र लेखनातील उच्च भाषेचा एक नवा अविष्कार 'इंद्रप्रकाश' मधून सुरु केला.[१५] जहाल विचारसरणीच्या उदयामुळे इतर मवाळ वृत्तीच्या वृत्तपत्राप्रमाणे हेही वृत्तपत्र १९२४ मध्ये बंद पडले. प्रा. न. र. फाटक यांचेही प्रारंभीचे लेखन व संपादन कौशल्य 'इंदूप्रकाश' मध्येच पहावयास मिळते.

**दीनबंधू -**

मराठी व इतर भाषांतील अनेक वृत्तपत्रे निघाली. या सर्वच वृततपत्रांचे चालक मालक अथवा लिहिणारे हे उच्च विद्याविभूषित व प्रामुख्यने ब्राम्हण वर्गातील अधिकतर होते. काळाच्या पुढे असलेल्या बहुजन समाजातच जन्म घेऊन बहुजन समाजाच्या उध्दाराचे कार्य करणा-या, महत्मा जोतिबा फुले यांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचे विचार सर्वत्र पसरविण्यासाठी व बहुजन समाजाची सुख दुःखे लक्षात घेऊन त्याला वाचा फोडण्यासाठी महात्मा फले यांनी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांच्या संपादकत्वाखाली पुण्यामध्ये १ जानेवारी, १८७७ रोजी 'दीनबंधू' सुरु केला.[१६] ब्राम्हणवर्गाने 'सत्यशोधक' समाजाच्या चळवळीवर टीका सुरु केली. या टीकेला तोंड देण्याचे काम दीनबंधूने केले. ९ मे, १८८० पासून 'दीनबंधू' नारायण मेघजी लोखंडे यांच्या संपादकात्वाखाली मुंबईमधून प्रकाशित होवू लागला. त्यांच्या मृत्यूनंतर हे वृत्तपत्र बंद पडले होते. १९२७ मध्ये डॉ. वि.मा. नवले यांनी पुण्यात 'दीनबंधू' सुरु केला तो अजनूही आहे.[१७] ब्राम्हणी वर्चस्ताविरुध्द प्रहार करणारे महाराष्ट्रातील 'दीनबंधू' हे

पहिले वृत्तपत्र होते. महात्मा फुले यांच्या कार्याला प्रेरणा देऊन त्यांचे विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य 'दीनबंधू' ने केले.

**किरण -**

केसरी- मराठा ही वृत्तपत्रे निघाल्यामुळे वृत्तपत्र इतिहासात एक वेगळा कालखंड सुरु झाला. पण या कालखंडाची सूचना ख-या अर्थाने १८७७ मध्ये निघालेल्या 'किरण' या पत्रामुळे मिळाली होती. केसरी मराठा या वृत्तपत्राच्या संस्थापकामधील महादेव बल्लाळ नामजोशी यांनी हे वृत्तपत्र सुरु केले होते. हे पत्र अल्पजीवी ठरले. परंतु थोडयाच काळात या वृत्तपत्राने केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. १८७७-७८ मधील दुष्काळ असो, १८७८ मधील वृत्तपत्रावर निर्बंध घालणारा कायदा असो या सर्वावर 'किरण'ने भरपूर टीका केली आहे.[१८]

**केसरी -**

४ जानेवारी, १८८१ रोजी सुरु झालेले 'केसरी' हे मराठी वृत्तपत्र म्हणजे वृत्तपत्राच्या इतिहासातील एक अविस्मरणीय घटना मानावी लागते. केसरीच्या अगोदर दोनच दिवस 'मराठा' इंग्रजी वृत्तपत्र सुरु झाले होते. 'केसरी'चे संपादकत्व गो.ग. आगरकर तर 'मराठा' चे संपादक लोकमान्य टिळक हे होते. केसरीमधील वाङ्.मय विषयाचे लिखाण चिपळूणकरांचे असे, इतिहास, अर्थशास्त्र किंवा फक्त सामाजिक विषयावरचे लेख आगरकर लिहित, तर धर्मशास्त्र व कायदा विषयावरचे अग्रलेख लोकमान्य टिळकांनी लिहिलेले असत.[११] पहिल्या वर्षी केसरीचा खप १८०० होता, १८८७ मध्ये अवघ्या ५/६ वर्षात ३० ते ३५ हजार झाला.[२०] यावरुन 'केसरी' ची लोकप्रियता लक्षात येते. ऑक्टोबर १८८७ पासून आगरकर-टिळक यांच्यातील

वैचारीक मतभेद वाढल्यामुळे आगरकर यांनी केसरीचे संपादकत्व सोडले. त्या वेळेपासून टिळकांनी आपल्या मृत्यूपर्यंत केसरीची जबाबदारी समर्थपणे पेलली.

'केसरी'ची विचारसरणी मुळातच जहाल होती. राजकीय विचारांना येथे अग्रक्रम दिला जात असे. ज्ञानदान करणे, जनतेचे मत मवाळपणे मांडणे ही वृत्तपत्राची भूमिका 'केसरी' ने मोडून काढली. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'उजाडले पण सूर्य कोठे आहे?', 'जनाब दिल्ली बहोत दूर है।', 'पुनःश्च हरी ओम' असे जहाल विचार असणारे अग्रलेख लिहिण्याचे धाडस फक्त केसरीनेच केले.[२१] सर्व मराठी वृत्तपत्रांमध्ये खप, लोकप्रियता, सातत्य, वाङ्.मयीन योग्यता, लोकजागृती निर्माण करण्याची क्षमता असणारे 'केसरी' शी तुल्यबळ ठरेल असे एक तरी वृत्तपत्र सापडेल की नाही शंकाच आहे.

सुधारक -

लोकमान्य टिळक व आगरकर यांच्या वैचारिक संघर्षामुळे आगरकरांनी केसरीचे संपादक पद सोडले. सामाजिक सुधारणा विचारांचा प्रसार करण्यासाठी दस-याच्या शुभमुहूर्तावर १५ ऑक्टोबर, १८८८ रोजी 'सुधारक' हे वृत्तपत्र सुरु केले. यासाठी त्यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांचे सहकार्य घेतले. सामाजिक सुधारणा करण्यासाठी शक्यतो कायद्याची मदत घ्यावी या विचारांचे आगरकर होते. 'सामाजिक सुधारणा आणि कायदा', 'आमचे दोष आम्हास कधी दिसू शकतील?', 'मुळ पाया चांगला पाहिजे', 'इष्ट दिसेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' अशा या अग्रलेखांवरुन आगरकरांची सामाजिक विचारसरणी लक्षात येते.[२२]

एकंदर मराठी वृत्तपत्राचा इतिहास पाहताना आपल्या हे लक्षात येते की आधुनिक मराठी वाङ्.मयाच्या विकासाला वृत्तपत्रांनी अव्वल दर्जाचे सहाय्य केले

आहे. तसेच अनेक सामाजिक व राजकीय चळवळी या वृत्तपत्रांनी यशस्वी केल्या आहेत. म्हणूनच ग्रंथ लेखनाऐवजी वृत्तपत्राचा उपयोग टिळक, आगरकर, परांजपे, केळकर इत्यादी मराठीतील रथी महारथींनी आपले विचार लोकापर्यंत पोहचविण्यासाठी केला आहे.[२३]

## कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी -

महाराष्ट्रातील वृत्तपत्रसृष्टी प्रमाणेच उज्वल परंपरा असणारी कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी आहे. ही परंपरा शंभर वर्षाहून अधिकची आहे. सुरुवातीचा काळ मासिकांचा व नियतकालिकांचा होता. जशी वृत्तपत्रांची संख्या वाढत गेली, तसे त्यांचे स्वरुपही बदलत गेले. कोल्हापूर जिल्हयात जी वृत्तपत्राची वाढ झाली तिला प्रामुख्याने दोन कारणे होती. यामध्ये पहिले कारण म्हणजे शेजारच्या ब्रिटीश हद्दीत सुरु असणा-या सामाजिक, राजकीय चळवळी व दुसरे कारण म्हणजे छत्रपती शाहू महाराजांनी अवलंबलेले क्रांतीकारक शिक्षणाचे धोरण की ज्यामुळे बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार अधिक झाला होता. या दोन कारणांमुळेच महाराष्ट्रातील पुणे व मुंबई ही दोन केंद्रे सोडली तर कोल्हापूरसारखी वृत्तपत्रसृष्टी दुसरीकडे आढळणार नाही.[२४] अशा या महान परंपरेतील काही वृत्तपत्रे पाहणे योग्य होईल.

## वर्तमान संग्रह -

कोल्हापूरात वर्तमानपत्राची सुरुवात झाली, तो काळ होता एजंट कारकिर्दीचा, कोल्हापूरचा या वेळेचा रेसिडंट कर्नल ॲन्डरसन याने आपल्या कारकिर्दीत अनेक सुधारणा केल्या. यामध्येच दरबारची छपाई करण्यासाठी दरबारी मालकीचा प्रेस सुरु केला. दरबारची छपाई पूर्ण झाल्यावर राहिलेल्या वेळात दरबारच्यामालकीचे वृत्तपत्र सुरु करण्याची त्याने कल्पना मांडली व त्याप्रमाणे 'वर्तमान संग्रह' या नावाने १८६४

मध्ये पहिले वर्तमानपत्र कोल्हापूरात उदयाला आले.[२५] राजा व प्रजा यांची सांगड घालावयाची एवढाच मर्यादित उद्देश होता.

**ज्ञानसागर -**

कोल्हापूरचे दुसरे नियतकालिक म्हणजे 'ज्ञानसागर' होय. प्रथम मासिक असणारे हे वृत्तपत्र नंतर साप्ताहिक झाले. १८७० मध्ये सुरु झालेल्या या पत्राचे संपादक रघुनाथ नारायण मंत्री हे होते. ज्ञानार्जन व ज्ञानप्रसार हे ध्येय या वृत्तपत्राचे होते. मंत्री यांनी १८७४ मध्ये 'सुज्ञानमूर्ती' नावाचे मासिक सुरु केले होते.[२६] यानंतर काही वृत्तपत्रे सुरु झाली. परंतु ज्ञानसागर बराच काळ कोल्हापूरात चालले होते.

वृत्तपत्राच्या संख्येत वाढ होत असतानाच करवीर काशीच्या धार्मिक परंपरेस अनुसरुन 'धर्मविचार', 'धर्मसंग्रह' अशी काही वृत्तपत्रे उदयाला आली पण ती फार काट टिकली नाहीत.[२७]

**विद्याविलास -**

कोल्हापूरच्या वृत्तपत्र सृष्टीतील सुरुवातीचे एक संस्मरणीय वृत्तपत्र म्हणून 'विद्याविलास' चा उल्लेख करावा लागतो. हे वृत्तपत्र १८८६ मध्ये कै. शंकरशास्त्री गोखले यांनी सुरु केले. ऑगस्ट १८८८ मध्ये त्याचे मासिकाचे साप्ताहिकात रुपांतर झाले.[२८] यानंतर पुढे द्विसाप्ताहिक, त्रिसाप्ताहिक व शेवटी दैनिक झाले. कोल्हापूरातील पहिले दैनिक व सर्वप्रथम प्रेस ट्रस्टकडून टेलिप्रिंटवर बातम्या घेणारे वृत्तपत्र म्हणजे 'विद्याविलास' होय. विद्याविलासचे धोरण पहिल्यापासून क्रांतीकारी विचाराचे होते. परंतु लोकजागृती करीत असताना 'विद्याविलास'च्या संपादकांना अनेक वेळा सरकारी खटल्यांना तोंड द्यावे लागले.[२९] विद्याविलासचे संपूर्ण स्वरुप रघुनाथशास्त्री गोखले यांनी आपल्या संपादकीय कारकिर्दीत बदलून टाकले. त्यामुळे

पुण्याचा जसा 'केसरी' तसा कोल्हापूरचा 'विद्याविलास' असा या पत्राचा नावलौकिक झाला. १९३६ ते १९४७ मध्ये कोल्हापूरात जे प्रचंड राजकीय आंदोलन झाले याचे मुखपत्र 'विद्याविलास' होते.

राजकीय चळवळीत नेहमीच आघाडीवर असणा-या या वृत्तपत्राचा शेवट झाला तोही राजकीय वावटळीत सापडल्यामुळे होय. १९४८ मध्ये महात्मा गांधींच्या हत्येनंतर महाराष्ट्रात जी जाळपोळ झाली त्याचे लोण कोल्हापूरातही पसरले. या जाळपोळीत या पत्राचे सर्वस्व जळाले.[३०] 'विद्याविलास' किंवा गोखले मंडळी आज लोकांच्या दृष्टीआड झाली असली तरी कोल्हापूरच्या वृत्तपत्र इतिहासात त्यांचे स्थान अढळ आहे.

**समर्थ व ग्रंथमाला** -

कोल्हापूरात गाजलेले आणखी एक वृत्तपत्र म्हणजे 'समर्थ' होय. १८९० मध्ये प्रा. विष्णू गोविंद विजापूरकर यांनी हे वृत्तपत्र सुरु केले. या पत्राचे धोरण राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार हे होते. या पत्राच्या उदयानंतर पुढे तीनच वर्षानंतर उदयाला आलेल्या 'शिवाजी क्लब' या कोल्हापूरच्या क्रांतीकारी संघटनेशी संबंध जोडण्यात येऊ लागला. या कारणावरुन 'समर्थ' कडे सरकारने जामीन मागितला. जामीन देण्याऐवजी पत्र बंद करण्याचे प्रा. विजापूरकर यांनी पसंद केले.[३१] अशा प्रकारे या वृत्तपत्राचा शेवट झाला. तसेच २ एप्रिल १८९४ ला शाहू महाराजांच्या अधिकार ग्रहणाच्या मूहर्त साधून प्रो. विजापूरकर यांनी ग्रंथमाला हे साप्ताहिक सुरु केले. पण ते १९०० ला बंद पडले. याशिवाय कोल्हापूरात 'वेदोक्त प्रकरण' ही चळवळ सुरु झाली होती. यावेळीही प्रा. विजापूरकरांनी शाहूविरोधी भूमिका घेतली होती. त्यामुळेदरबारचाही रोष समर्थ या वृत्तपत्रांवर होता. १९०९ मध्ये हे वृत्तपत्र बंद करण्याअगोदर १९०६ मध्येच प्रा. विजापूरकरांनी 'विश्ववृत्त' हे मासिक सुरु केले

होते.[३२] या पत्रातून दरबारवर टीका करण्याचे व ब्राम्हणाचे गौरव करण्याचे धोरण होते त्यामुळे हे वृततपत्र लवकरच बंद पडले.

**हंटर -**

१९११ मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. या समाजाचे 'हंटर' हे गाजलेले वृत्तपत्र होय. १९२५ मध्ये हरिभाऊ चव्हाण व रामभाऊ जाधव यांनी हे वृत्तपत्र सुरु केले.[३३] परंतु या पत्राचा विशेष गाजावाजा झाला तो हे पत्र कोल्हापूरातील एक नामवंत वकील व माधवराव बागल यांचे वडील खंडेराव बाग ल यांच्याकडे आल्यावर होय. संस्थांनी काळात वृततपत्र चालविणे म्हणजे तारेवरची कसरत असे. परंतु खंडेराव बागल निर्भिडपणे 'हंटर' मधून दरबारवरही टीका करत. अस्पृशता निवारण, हिंदू मुस्लीम ऐक्य, खादी प्रसार या तत्वाचा हंटर मधून नेहमी पुरस्कार करण्यात येत असे. कोल्हापूरात अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जी सहभोजने होत त्या सहभोजनात भाग घेणा-यांच्या नावाची यादी 'हंटर' मधून प्रकाशित होत असे. परंतु सत्यशोधक समाजाच्या इतर वृत्तपत्रांप्रमाचे हे पत्र ही अल्पजीवी ठरले. १९३० मध्ये हंटरचे प्रकाशन बंद झाले.[३४]

हंटर प्रमाणेच माधवराव बागल यांचे संपादकत्वाखाली प्रसिध्द होणारे 'अखंड भारत' हे साप्ताहिक चांगले लोकप्रिय झाले होते. या पत्रासही जामीन द्यावा लागला होता. तसेच 'मराठा दीनबंधू' या नावाचे एक साप्ताहिक १९०१ मध्ये भास्करराव जाधव, डी.ए. विचारे व राणे यांनी सुरु केले होते. परंतु आर्थिक अडचणीमुळे १९०५ मध्ये त्यांना बंद करावे लागले.[३५]

**सुदर्शन -**

कोल्हापूरच्या वृत्तपत्र सृष्टीमध्ये काही चांगल वृत्तपत्रे अल्पजीवी ठरली. त्यामधील अल्पजीवी ठरलेले व कोल्हापूरात गाजलेले वृत्तपत्र म्हणजे 'सुदर्शन' होय. 'सुदर्शन' वृत्तपत्राला कै. प्राचार्य बाळासाहेब खर्डेकर यांचे संपादकत्व लाभले.[३६] प्राचार्य बाळासाहेब खर्डेकर हे एक आदरणीय विशाल अंतकरणाची व्यक्ती होती. त्यांच्या नावाचाच उठाव 'सुदर्शन' ला मिळाला. भरपूर खपाचे हे दैनिक केवळ व्यवस्थापना अभावी बंद पडले. अल्पावधीत सुदर्शन इतके लोकप्रिय झालेले दुसरे दैनिक दाखविता येणार नाही.

**गरुड -**

कोल्हापूरच्या आणखी एका वृत्तपत्राचा येथे गौरवपूर्ण उल्लेख केला पाहिजे. ते वृत्तपत्र म्हणजे दलित सेवक श्री दादासाहेब मल्हारराव शिर्के यांचे 'गरुड' हे साप्ताहिक होय. १९२६ साली दादासाहेबांनी हे साप्ताहिक कोल्हापूरात सुरु केले.[३७] दादासाहेब शिर्के यांनी 'गरुड' दलिताच्या उध्दाराला वाहिले होते. दादासाहेब शिर्के हे दलित वर्गातीलच असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयाची होते. दलितांच्या मागण्या, दलित समाजावर होणारे अन्याय यांनाच 'गरुड' मध्ये निःसंशय अग्रस्थान दिले जात असे. कोल्हापूरातील एका दलित वर्गीयाने प्रतिकूल परिस्थितीत दीर्घकाळ चालविलेले वृत्तपत्र म्हणून 'गरुड' चा गौरव करणे आवश्यक आहे. कारण अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार असणार तो किती व हे वृत्तपत्र घेऊन वाचणारे आर्थिकदृष्टया सबळ असे किती लोक असणार? परंतु दादासाहेब शिर्के यांनी अत्यंत ध्येयनिष्ठ विचाराने हे वृत्तपत्र जवळजवळ अडीच तप चालविले. १९५२ मध्ये हे वृत्तपत्र बंद पडले आहे. आंबेडकरांचे विचार जनमाणसात रुजविण्याचे कार्य 'गरुड'ने अत्यंत महत्वपूर्ण असे केले.

या काही मोजक्याच वर्तमानपत्रांकडे पाहिले तरी आपल्यास कोल्हापूरची वर्तमानपत्रे किती उज्वल परंपरा व सामाजिक, राजकीय कार्यात पुढाकार घेणारी होती हे लक्षात येते. या वृततपत्रानंतर कोल्हापूरात आपला एक वेगळा विशेष निर्माण करणारे वृत्तपत्र जन्माला आले ते म्हणजे दैनिक 'सत्यवादी' होय, जे आपल्या कार्याने बहुजन समाजाचे मुखपत्र बनले.

**सत्यवादीची स्थापना -**

कोल्हापूर हे राजर्षि शाहू महाराजांच्या कारकिर्दीत ख-या अर्थाने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पुरोगामी विचाराच्या चळवळीचे महत्वाचे केंद्र बनले. राजर्षि शाहूंची ही तेजस्वी कार्याची परंपरा पुढे त्यांच्या वारसांनी म्हणजे छत्रपती राजाराम महाराजांनी सुरु ठेवली. त्यामुळे शाहूंच्या कालखंडाप्रमाणेच राजाराम महाराजांच्याकाळातही अनेक नवी वृत्तपत्रे जन्माला आली. यामधील एक उदयाला आलेले वृत्तपत्र म्हणजे दैनिक सत्यवादी होय. अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केलेले, संस्थानी कालखंडात व स्वातंत्र्योत्तर कालखंडात यशस्वी वाटचाल करणा-या या दैनिक सत्यवादीची वाढ प्रगती करण्याचे सर्व श्रेय त्याचे संपादक कै. पद्मश्री पत्रकार बाळासाहेब पाटील यांनाच आहे.

'प्रगती व जिनविजय' हे दक्षिण महाराष्ट्र जैन सभेचे मुखपत्र असणा-या साप्ताहिकातून बाळासाहेब पाटील यांनी पत्रकारितेस सुरुवात केली. परंतु विचारातील मतभेदामुळे त्यांनी स्वतःचे पत्र काढावयाचे ठरविले. त्याप्रमाणे 'सत्यवादी' हे नावही त्यांनी निश्चित केले. परंतु कोल्हापूर हे संस्थान होते. त्यांच्या काही जवळच्या मित्रांनी त्यांना संस्थानात पत्र काढण्याऐवजी ब्रिटीश हद्दीत वृत्तपत्र काढावे असा सल्ला दिला.[३८] त्यामुळे सांगली जवळील सातारा जिल्हयात असलेल्या कुपवाड या गावी 'सत्यवादी'चे प्रकाशन करावे असे ठरविले. सत्यवादीकार १९२६ च्या एप्रिल

महिन्यात साता-यास गेले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या घरी अशा प्रकारे सत्यवादीचा जन्म झाला.

सत्यवादीचे डिक्लरेशन सातारा, प्रकाशन स्थळ कुपवाड, छपाई बेळगावला व सर्व व्यवहाराचे ठिकाण सांगली अशी सत्यवादीकारांची चौस्थळी यात्रा सुरु झाली. सतयवादीकारांच्या अविश्रांत परिश्रमानंतर २१ मे, १९२६ रोजी 'सत्यवादी'चा पहिला अंक बाहेर पडला. एका शेतक-याच्या पोटाला जन्माला येऊन संपादक होण्याचे सत्यवादीकारांचे स्वप्न पूर्ण झाले. या पहिल्या अंकावर संपादक : पाटील बी.ए. (कवी बळवंत) असे सत्यवादीकारांचे काव्यमय नाव होते. याच अंकावर या पत्राचे धोरण सांगण्यासाठी त्यांनी एक हिंदी सुभाषित दिले होते. ते असे होते -

'न हो पक्षपाती, बतावे सुमार्ग।'

डरेना किसीसे, कहे सत्यवाणी।'[३१]

या सुभाषिताप्रमाणेच सत्याची वाटचाल करण्याचे धोरण सत्यवादीने अखेरपर्यंत ठेवले आहे.

सत्यवादी प्रथम सुरु झाला तो पाक्षिक स्वरुपात यावेळी सत्यवादीकार हे एकटेच सर्वाधिकारी होते. त्यांना सर्वाधिकारी एवढयासाठी म्हणावयाचे ते म्हणजे ऑफिस झाडण्यापासून ते अंक टाकण्यापर्यंत व संपादक, बातमीदार ही सर्वच कामे त्यांनाच करावी लागत. अशाप्रकारे ते सत्यवादीचे सर्वेसर्वा होते. यावेळी सत्यवादीची वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह फक्त ३ रुपये होती. या पहिल्याच वर्षी सत्यवादीकारांनी अत्यंत कष्ठाने कोल्हापूर पासून हुबळी पर्यंत व सोलापूर पासून मुंबई पर्यंत १ हजार वर्गणीदार मिळविले. या पहिल्या वर्षी सत्यवादीकारांनी केवळ बहुजन समाजाचे शिल्पकार म्हणून आण्णासाहेब लठ्ठे यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारा

'आण्णासाहेब लठ्ठे खास अंक' काढला व येथून पुढे सत्यवादीच्या खास अंकाची मालिकाच सुरु केली. १९२८ मध्ये 'माईणकर खास अंक' 'विधवा विवाह पुरस्कार अंक' काढले. विधवा विवाहाचा पुरस्कार कराणारा हा अंक म्हणजे सत्यवादीकारांच्या पुरोगामी विचारांची निशाणी होती[४०]. परंतु या दोन अंकांच्या अविश्रांत श्रमामुळे सत्यवादीकार आजारी पडले. सत्यवादीचे विरोधक 'सत्यवादी आता बंद पडणार' असे म्हणते होते. परंतु आजारातून उठताच १९२८ मध्ये 'राजर्षि शाहू खास अंकाची' सत्यवादीकारांनी घोषणा करुन विरोधकाची तोंडे बंद केली. परंतु दुर्दैवाने 'राजर्षि शाहू खास अंका'चा जो आर्थिक दृष्टया तडाखा बसला त्यामुळे सत्यवादीस वाटेवर येण्यास दीड वर्षाचा काळ लागला. '''बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीद वाक्य असणा-या सत्यवादीच्या सांगली कार्यालयास २५ फेब्रवारी १९२७ रोजी महात्मा गांधी यांनी भेट दिली होती[४१]. सत्यवादीच्या जीवनातील हा अत्यंत महत्वपूर्ण प्रसंग आहे. त्यामुळे गांधी विचाराचे अनुयायी असणा-या सत्यवादीकारांनी सतत महात्मा गांधीच्या विचारांचा, कार्याचा पुरस्कार केला आहे.

**कोल्हापूरात सत्यवादी -**

१९२६ मध्ये सत्यवादी जरी ब्रिटिश हद्दीत सुरु झाला. तरी सत्यवादीचे सर्व व्यवहार सांगली मधून सुरु होते. सत्यवादीकारांचे बहुजन समाजवादी धोरण अधिक तीव्र होत असतानाच त्यांनी 'राजर्षि शाहू खास अंक' सारखा क्रांतीकारक अंक काढला. याचा परिणाम म्हणजे सांगलीतील वातावरण सत्यवादीस प्रतिकूल होवू लागले. यातच आर्थिक अडचणीमुळे सत्यवादीचे प्रकाशन बंद झाले. पत्रकाराचा पिंड असणा-या सत्यवादीकारांना स्वस्थ बसवेना तेव्हा त्यांनी आपल्या विचाराशी सहमत असणा-या मित्राचे सहकार्य घेऊन कोल्हापूरात १९३० मध्ये 'सत्यवादी' साप्ताहिक स्वरुपात सुरु केले. सत्यवादीचा कोल्हापूरात प्रेस नव्हता त्यामुळे सुरुवातीला

सत्यवादीची छपाई 'सुदर्शन' प्रेस मध्ये होत असे[४२]. २१ नोव्हेंबर १९३१ पासून 'वीर मुद्रण मंदीर' या नावाने सत्यवादीचा स्वतःचा छापखाना सुरु झाला. स्वतःचा छापखाना झाल्यानंतर सत्यवादीकारांनी 'सत्यवादी' पत्राला जोराची गती देण्याचे ठरवून सत्यवादीची पान संख्या वाढविली. येथून पुढे संपादकीय लेखाना ही तीव्र धार येऊ लागली. सामाजिक विषयावरील अग्रलेख अत्यंत वाचनिय व आग्रही मताचे होवू लागले.

१९३४ पासून सत्यवादीचा स्वतंत्र 'स्त्री विभाग' सुरु करण्यात आला. तो आजही यशस्वी पणे सुरु आहे. सर्व मराठी वृत्तपत्रात स्वतंत्र 'स्त्री विभाग' व त्यासाठी स्वतंत्र स्त्री पदवीधर संपादिका असलेले 'सत्यवादी' हे एकमेव वृत्तपत्र असेल[४३]. आज अनेक वृत्तपत्रांनी स्त्री विभाग सुरु केले तरी त्यामध्ये विशेष काही नाही कारण भारतीय घटनेने स्त्रियांना पुरुषाबरोबरचे हक्क दिले आहेत. परंतु सत्यवादीमध्ये स्त्री विभाग सुरु केला त्यावेळी नुकतीच स्त्री शिक्षणाची सुरुवात झाली होती. अशा वेळी संस्थानी वातावरणात असा क्रांतीकारक विभाग सुरु करणे धाडसाचे होते. परंतु पुरोगामी विचाराच्या सत्यवादीकारांनी हे धाडस केले. या विभागातून अनेक स्त्री संपादिका, स्त्री लेखिका पुढे आल्या. १९४६ मध्ये 'स्त्री शक्ती खास अंक' काढला. तो संपूर्ण महाराष्ट्रभर गाजला.

दैनिक सत्यवादीची वाटचाल ही हतीची वाटचाल होती. सत्यवादीचे ऑफिस सांगलीमध्ये सुरुवातीपासून होते. १९३४ मध्ये सत्यवादीच्या पुणे शाखा कचेरीस सुरुवात झाली[४४]. यावेळी संपादक सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांनी यापुढे बेळगाव, सोलापूर, सातारा, मुंबई याठिकाणी शाखा स्थापन करण्याचा विचार जाहीर केला. त्याप्रमाणे १ ऑक्टोंबर १९६४ रोजी सातारा येथे सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष दे. भ. यशवंतराव पार्लेकर यांच्या हस्ते सातारा शाखेचे उद्‌घाटन झाले[४५]. प्रथम

पाक्षिक असणारे सत्यवादी, १९३० मध्ये कोल्हापूर सेथून सुरु होताना साप्ताहिक झाले, जाने. १९४३ मध्ये व्दिसाप्ताहिक झाले. १ जून १९४७ या दिवसापासून सत्यवादी सांयदैनिक झाले व दक्षिण महाराष्ट्रातील पहिले सांयदैनिक होण्याचा मान सत्यवादीने मिळविला[४६]. यावेळी हा सांयदैनिकाचा अंक सांगलीतून सकाळी प्रकाशित होत असे. तसेच या अंकाची पाने ४ होती. आकारही पूर्वीपेक्षा थोडा वाढविला होता. जून १९५३ पासून सत्यवादी सकाळचे दैनिक झाले व यावेळेपासून युनायटेड प्रेस ऑफ इंडिया या वृत्तसंस्थेच्या बातम्या सत्यवादीतून प्रकाशित होवू लागल्या.

**सत्यवादी ची वैशिष्टये -**

दै सत्यवादी हे पत्र अगदी सुरुवातीपासून आपल्या वेगळया वैशिष्टयामुळे वृत्तपत्र सृष्टीत आघाडीवर राहिले आहे. सत्यवादीची सुरुवातीची पान संख्या १० होती. १९३५ ते १९३९ मध्ये पानाची संख्या २० झाली. तर १९३९ पासून साप्ताहिक असताना कधी १४ तर कधी १६ आहे. व्दिसाप्ताहिक असताना ६ किंवा ८ असे. दैनिक ४ पानांचे असे. १९३३ पासून सत्यवादीकारांनी एक वेगळा उपक्रम केला होता. जगातील राष्ट्रपुढारी हे सदर सुरु करण्यात आले. या सदरामधून अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट, महात्मा गांधी, इटालीचा सर्वाधिकारी सिनॉर मुसोलिनी, तुर्कस्थानचा मुस्ताला केमालपाशा, जर्मनीचा हेर हिटलर, रशिया स्टॅलिन, चर्चिल या सर्वावरील जीवनक्रम व कार्य सांगणारे लेख प्रसिध्द केले जात. १९३७ पर्यंत सत्यवादीमध्ये दर महिन्याचे भविष्य दिले जात असे. १९३८ पासून साप्ताहिक भविष्य दिले जाई. गुढी पाडवा हा हिंदुचा नवीन वर्षाचा शुभारंभ दिवस या दिवशीच्या अंकात संपूर्ण वर्षाचे भविष्य देण्यात येत असे. जगातील विविध गंमती हे एक सदर सत्यवादीमध्ये असे यामध्ये जगातील विनोदपूर्ण घटना दिल्या जात असत. हिंदी संस्थाने या कॉलममध्ये हिंदुस्थानातील संस्थानाची माहिती असे विशेष करुन या सदरामध्ये दक्षिण

महाराष्ट्रातील संस्थानच्या घडामोडी दिल्या जात. सांगली जिल्हयाची माहिती व बातमीपत्र देणारा सांगली विभाग सत्यवादीमध्ये वेगळा विभाग होता. सहकारी कार्याचा गौरव करणारा सहकारी विभाग, शैक्षणिक माहिती देणारा शिक्षण विभाग असे स्वतंत्र विभाग सत्यवादीमध्ये असत. १९३७ पर्यंत विमा कंपन्याची प्रशंसनीय वाढ झाली. बहुजन समाजाला विमा कंपन्याबद्दलची असणारी उत्सुकता, विमा कंपन्याची माहिती, आगामी विमा कायदा विम्याचे महत्व विमेदाराच्या तक्रारी यासाठी सत्यवादीमध्ये वेगळा विमा विभाग सुरु करण्यात आला व जनसेवेचा एक वेगळा उपक्रम हाताळला आहे[४७]. बोलपट, चित्रपट याविषयी मुकपटाच्या निर्मितीपासून सर्वांनांच अत्सुकता असते. ही उत्सुकता पूर्ण करण्याचे काम दैनिक सत्यवादीने अगदी सुरुवातीपासून सिनेमा जगत या विभागातून केले आहे. या विभागातून चित्रपटांची परिक्षणे, नट, नटी यांच्या मुलाखती धर्मात्मा, तुकाराम, कूंकू अशा चांगल्या चित्रपटाचा गौरव केला. समाजाच्या संस्कृतिवर अनिष्ठ परिणाम करणा-या चित्रपटावर टीका करण्यात येत असे. एकदंर सत्यवादी हे वृत्तपत्र समाजातील विविध घटकांची मानवाला असणारी जिज्ञासा तृप्त करणारे होते. १९६९ मध्ये रविवारचा 'सत्यवादी' टॉप सत्यवादी करण्यात आला. पानाची संख्या आठ करुन यामध्ये महिला विभाग, सिनेमा जगत, बालवाडी (फुलबाग), ललित साहित्य इत्यादी सदरे नियमित सुरु करण्यात आली[४८]. ती आजही सुरु आहेत. या रविवारच्या सत्यवादीतून अनेक नवोदित लेखकांच्या कथा, कांदब-या प्रकाशित झाल्या ते सध्याचे मोठे साहित्यीक बनले आहेत. सत्यवादीकारांनी आपल्या दोन कांदब-या, एक नाटक काही आपल्या आठवणी, प्रवास वर्णने याच रविवारच्या सत्यवादीतून क्रमशः प्रकाशित केली. क्रिडा विभाग हा विभागही अगदी सुरुवातीपासून सत्यवादीमध्ये आहे. यामधून राजाराम महारांजानी सुरु केलेल्या टेनिस सामन्यापासून ते कुस्ती क्रिकेट इत्यादी सर्व क्रिडा

प्रकारची माहिती व बातम्या दिल्या जात असते. सत्यवादीकार हे स्वतःच कुस्तीगीर व कुस्ती शौकीन असल्यामुळे मल्लविदेयचा या विभागातून विशेष गौरव केला आहे. कोल्हापूरातील वारंवार होणा-या कुस्तीच्या मैदानाचे संपूर्ण वृत्त सत्यवादीतून नेहमीच प्रकाशित करण्यात येत असे.

एकदंर सत्यवादीच्या आजच्या यशात बाळासाहेब पाटील यांच्या राजकिय ज्ञानाचा वाटा फार मोठा आहे. राजकारणातील वारे कोणत्या दिशेने वाहतात याची अचूक कल्पना सर्वात प्रथम "सत्यवादी" ला असते. संस्थानातील पत्र असतानाही 'सत्यवादीने' महात्मा गांधीच्या राजकिय सामाजिक धोरणाचा पुरस्कार केला. तसेच संस्थानचे विलिनीकरण, विलिनीकरणानंतर नोकरांचा प्रश्न, न्यायव्यवथा, संथानिकांचा तनखा या प्रश्नाचा सत्यवादीतून सतत पाठपुरावा केला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आंदोलनाची माहिती देत असतानाच ज्यावेळी सर्वत्र यशवंतराव विरोधी वातावरण निर्माण झाले. त्यावेळी यशवंतरावाना पाठिबां देण्याची कामगिरी सर्वप्रथम 'सत्यवादी'नेच केली. सांगली जिल्हयात वसंतदादा पाटील, राजाराम बापू पाटील यांचे नेतृत्व 'सत्यवादी' नेच उचलून धरले. इंडिकेट-सिंडीकेट वादात यशवंतरावांची भूमिका स्पष्ट होण्यापूर्वीच 'सत्यवादी' ने गिरी यांच्या राष्ट्रपती पदाच्या उमेदवारीचा पुरस्कार केला. इंदिरा गांधीच्या ध्येयधोरणाचा सतत पाठपुरावा केला. संस्थांनी काळात वृत्तपत्र चालविणे किती कठीण आहे हे 'विदयाविलास' 'समर्थ' या पत्रावरुन दिसत असताना 'सत्यवादी' हुजूरस्वारीचे शिकारीचे वर्णन वाढदिवस त्यांचे दरबारी मानकरी त्यांच्या बहादुरीची वर्णने करत संस्थानात ही वर्तमान पत्र यशस्वी केले[४१].

सत्यवादीने कधीही कुणाची टिंगलटवाळी केली नाही. आपल्या मताचा निर्भिडपणे पुरस्कार केला. सत्यवादी कोणत्याही राजकिय पक्षाचे मुखपत्र नव्हते. परंतु

बहुजन समाजाचे मुखपत्र अशी सत्यवादीची त्याच्या कार्यामुळे ख्याती झाली होती. सत्यवादीच्या या सर्व कार्याचे श्रेय त्याचे प्रदीर्घ काळ संपादक असलेले पद्मश्री बाळासाहेब पाटील यांना आहे. एखादया वर्तमान पत्राच्या इतिहासात साठ वर्षापेक्षा अधिक काम करणे दुर्मिळ असते. परंतु सत्यवादीच्या बाबतीत पद्मश्री बाळासाहेब पाटील यांचे संपादकत्व ही सत्यवादीच्या यशाची बाजू आहे.

## संदर्भ


१. केळकर न. चि. वृत्तपत्रमिमांसा पृ. ३

२. लेले रा. के. मराठी वृत्तपत्राचा इतिहास पृ.१०

३. कानडे रा. गो. - मराठी नियतकालिकांचा इतिहास पृ.२

४. लेले रा. के. उ.नि. पृ.२३

५. कित्ता - पृ.२५

६. कित्ता - पृ.२६

७. कित्ता - पृ.५

८. धारुरकर वि. ल. - भारतीय वृत्तपत्रात मराठी वृत्तपत्रसृष्टी (लेख) पुढारीकार 'ग. गो. जाधव' गौरव ग्रंथ १९८२ (संपा.) एस. एस. भोसले पृ.७७

९. कित्ता पृ.७८

१०. लेले रा. के. उ. नि. पृ.५६

११. कित्ता - पृ.७०

१२. कित्ता - पृ.८२

१३. कित्ता - पृ. ९६

१४. धारुरकर वि. ल. - उ. नि. पृ. ८४

१५. लेले रा. के. उ. नि. पृ-१५२

१६. धारुरकर वि. ल. - उ. नि. पृ-१८८

१७. लेले रा. के. उ. नि. पृ. २०७

१८. जोग रा. श्री. - मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास पृ. १९२

१९. केळकर न. चि. - उ. नि. पृ.८३

२०. जोशी प्र. न. - मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास पृ.५२

२१. धारुरकर वि. ल. - उ.नि. पृ.९२

२२. लेले रा. के. उ.नि. पृ.३२२

२३. देशपांडे अ. ना. - आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास पृ.५८

२४. चव्हाण शिवाजीराव - कोल्हापूरची वृत्तपत्र सृष्टी (लेख) कोल्हापूर दर्शन- (संपा.) भिडे. जी. आर. व देशपांडे पी. एल पृ.३९७

२५. आनंदराव तेलवेकर - कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी (लेख) पुढारीकार 'ग. गो. जाधव' गौरव ग्रंथ १९८२ (संपा.) भोसले एस. एस. पृ.११२

२६. Mane D. A. - Growth of the press In The princely state of Kolhapur (From 1922 to 1949) M.phil. Dissertation p- 6

२७. तेलवेकर आनंदराव - उ. नि. पृ. ११२

२८. लेले रा. के. - उ.नि. पृ.६२८

२९. चव्हाण शिवाजीराव - उ.नि. पृ.४०३

३०. लेले रा. के. - उ.नि. पृ.६२८

३१. चव्हाण शिवाजीराव - उ.नि. पृ.३९८

३२. माने डी. ए. - उ.नि. पृ.९

३३. धारुरकर वि. ल. - उ.नि. पृ.१२१

३४. लेले रा. के. - उ.नि. पृ.८००

३५. माने डी. ए. - उ.नि. पृ.९

३६. चव्हाण शिवाजीराव - उ.नि. पृ.४०१

३७. Kurane C. P. - Life And Work of Dadasaheb Shirke, M.phil Dissertation p. 24

३८. पाटील बा. आ. जीवनचक्र पृ. २५

३९. कित्ता - पृ.२६

४०. (संपा.) प्रा. हेरवाडे श्रीधर - सत्यवादीकार पद्मश्री बाळासाहेब पाटील-पत्रकारिता हीरकमहोत्सव (१९२४-१९८४) पृ. ७

४१. कित्ता - पृ.९

४२. पाटील बा. आ. - उ.नि. पृ.४२

४३. प्रा. हेरवाडे श्रीधर - उ.नि. पृ.९

४४. दै. सत्यवादी १२ जून १९३५ पृ.८

४५. दै. सत्यवादी २ ऑक्टोंबर १९६४ पृ.२

४६. दै. सत्यवादी १ जून १९४७ पृ.२

४७. दै. सत्यवादी १ सप्टेंबर १९३७ पृ.५

४८. प्रा. हेरवाडे श्रीधर - उ. नि. पृ. २१

४९. चव्हाण शिवाजीराव - उ. नि. पृ- ४०६